# संपादकीय...

## पर्यटकांवर हल्ले

काश्मीरमध्ये शाळकरी मुलांच्या बसवर झालेल्या दगडफेकीची घटना ताजी असतानाच श्रीनगरहून गुलमर्गकडे निघालेल्या पर्यटकांच्या एका वाहनावर झालेल्या दगडफेकीत एक पर्यटक मृत्युमुखी पडला. काश्मीर खोऱ्यांमध्ये गेली किमान आठ – दहा वर्षे हिंसाचार चालला आहे, परंतु पर्यटकांवर सहसा हल्ले होत नव्हते. जेव्हा दहशतवाद्यांनी तसे हल्ले चढवले तेव्हा स्थानिक काश्मिरी जनतेने त्या विरोधात प्रतिक्रिया व्यक्त केली होती, कारण पर्यटन हे लक्षावधी काश्मिरींसाठी रोजीरोटीचे साधन आहे. मात्र, या वर्षी काश्मीरमध्ये येणाऱ्या पर्यटकांना लक्ष्य करण्याच्या घटना वाढत असल्याचे दिसते. आजवर दगडफेक करणारे काश्मिरी युवक केवळ लष्कर, निमलष्कर वा पोलिस यांनाच लक्ष्य करायचे, परंतु केंद्र सरकारने दहशतवाद्यांविरुद्ध स्वीकारलेले कठोर धोरण आणि त्याची परिणती म्हणून सातत्याने चाललेला देशद्रोह्यांचा खात्मा यामुळे वैफल्यग्रस्त झालेल्या शक्ती आता शाळकरी मुले आणि पर्यटक यांनाही लक्ष्य बनवू लागल्याचे दिसते आहे. खरे म्हणजे अशा प्रकारचे हल्ले हा काश्मिरींसाठी आत्मघातच ठरणार आहे. पर्यटन हे काश्मीरच्या अर्थव्यवस्थेचे एक प्रमुख अंग आहे. राज्याच्या उत्पन्नात पर्यटनक्षेत्राचा वाटा सात टक्क्यांचा आहे. दहशतवाद आणि हिंसाचारामुळे गेल्या दोन वर्षांत खोऱ्यातील पर्यटनात मोठी घट दिसून आली आहे. पर्यटन वृद्धीसाठी मग जम्मू काश्मीर पर्यटन विभागाने जोरदार प्रयत्न केले. पत्रकारांचे दौरे आखले, पर्यटकांना ५० टक्के सवलत जाहीर केली, काश्मीर सुरक्षित आहे हा संदेश पोहोचवण्याची धडपड केली. तरीही गेल्या वर्षी पर्यटकांची संख्या रोडावलेलीच राहिली. आता थेट पर्यटकांनाच जर अशा प्रकारे लक्ष्य केले जाणार असेल तर काश्मीरच्या पर्यटनाचा कणा मोडून गेल्याशिवाय राहणार नाही. जवळजवळ पंचवीस लाख काश्मिरींचे पोट जरी पर्यटनावर चालत असले तरी पर्यटन नसेल तर 'हम भूखे नही मरेंगे' अशी भाषा तेथे ऐकू येते, कारण सफरचंद, अक्रोड आणि इतर सुक्या मेव्याचे मोठे उत्पन्न खोऱ्यात घेतले जाते. त्याची मोठ्या प्रमाणावर निर्यात चालते. काश्मिरी सफरचंदांची निर्यात १.७३ दशलक्ष मेट्रीक टनच्या घरात आहे. अक्रोडाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत काश्मीरचा वाटा सात टक्के आहे. शिवाय गालिचे, शाली, अक्रोडाच्या लाकडाच्या वस्तू वगैरे हस्तकलेचीही निर्यात होते. त्यामुळे अर्थात पैसा खुळखुळत असतो. पण पर्यटनात घट होणे म्हणजे रोजगाराला मुकणे ठरेल हे लक्षात घेणे जरूरी आहे. पर्यटनावर किती प्रकारचे लोक अवलंबून असतात पाहा – हॉटेलवाले, ट्रॅव्हल एजंट, भाडोत्री वाहनधारक, हाऊसबोटवाले, शिकारेवाले, घोडेवाले, गाईड, हस्तकला व्यावसायिक, पर्यटनस्थळांवरील दुकानदार ही सगळी मंडळी केवळ पर्यटनावर अवलंबून असते. हिंसाचारामुळे हॉटेल, हाऊसबोटींतील पर्यटकांच्या वास्तव्याचे प्रमाण अर्ध्याहून अधिक उतरले आहे. याचे खापर आजवर इलेक्ट्रॉनिक मीडियावर फोडले जात असे. केंद्रातील मोदी सरकारचा हा डाव असल्याचा आरोप होत होता. काश्मीरमधील दगडफेकीचा त्रास पर्यटकांना कधीही झालेला नाही, पण टीव्हीवाले अशा घटना अतिरंजित स्वरूपात दाखवतात असा काश्मिरी जनतेचा आक्षेप असे आणि ते खरेही होते. परंतु परवाची घटना जर पाहिली तर आता थेट पर्यटकांनाच लक्ष्य केले जाताना दिसते आहे. गेल्या काही दिवसांत काश्मीरमध्ये पर्यटकांवर अनेक ठिकाणी असे दगडफेकीचे प्रकार घडले आहेत. गेल्या ३० एप्रिलला केरळच्या पर्यटकांना लक्ष्य करण्यात आले. मुंबईची एक महिला जखमी झाली. आता चेन्नईचा २२ वर्षांचा तीर्थमणी दगडफेकीत हकनाक ठार झाला आहे. दगडफेक करणाऱ्या काश्मिरी तरुणांना चिथावणी देणाऱ्यांना पाकिस्तानातून पैसा येतो हे तर आता उघड गुपीत आहे. अशा दगडफेक करणाऱ्यांना 'संगबाज' म्हणतात. हा एक धंदाच होऊन बसला आहे. त्यांना महिन्याला सात – आठ हजार रुपये 'पगार' मिळतो. कपडे मिळतात, बूट मिळतात. आयएसआयने आजवर यावर आठशे कोटी रुपये खर्च केल्याचे गुप्तचर यंत्रणांनी उघडकीस आणले आहे. फुटिरतावादी नेते त्या पैशात ऐषारामात राहतात. एवढे असूनही या दगडफेक करणार्या गावगुंडांवर लष्कर वापरत असलेल्या पेलेट गनवर केवढा गहजब करण्यात आला. दगडफेक करणारे हे आमचे 'बच्चे' आहेत असे मायेचे कढ मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्तींना येत होते. आज निरपराध पर्यटकांना हे 'बच्चे' लक्ष्य करू लागले आहेत, त्यावर मात्र आपली मान शरमेने झुकल्याचे नक्राश्रू त्या आणि उमर अब्दुल्ला ढाळत आहेत. दगडफेक करणारी टोळकी फोफावण्यास काश्मीरचे ढोंगी नेतृत्वच खरे तर जबाबदार आहे. पर्यटकांवरील या हल्ल्यांनी काश्मीरचीच कोंडी होईल. काश्मीरमध्ये येणारे पर्यटक कारगिल, लेह – लडाखकडे वळतील. काश्मिरींची भले उपासमार होणार नाही, परंतु बेरोजगारीचे मोठे संकट ओढवेल त्याचे काय? आत्मघाताकडे आपण वाटचाल करीत आहोत हे काश्मिरींना उमगायला हवे. पाकिस्तानला विकले गेलेले म्होरके आपल्याला वापरून घेत आहेत, देशोधडीला लावत आहेत हे या मंडळींना कधी कळणार? ●●●

# बारामतीतील ५७ सहकारी संस्था अवसायनात

**बारामती (प्रतिनिधी) :** 'सहकारी संस्थांचे ग्रामीण अर्थव्यवस्थेत अत्यंत महत्त्वाचे योगदान आहे. सर्व सहकारी संस्थांचे कामकाज सहकार कायदा, नियम, संस्थेचे उपविधी, आणि मार्गदर्शनक सूचना व सरकारच्या धोरणात्मक निर्णयास आधीन राहून काम करणे अपेक्षित आहे. मात्र, काही संस्थांच्या कामकाजात आढळून आलेल्या त्रुटी, अनियमितता व गैरव्यवहार, लेखापरीक्षण यांच्यामुळे तालुक्यातील ५७ सहकारी संस्था अवसायनात गेल्या आहेत,' अशी माहिती सहायक निबंधक प्रशासनाने 'मटा'ला दिली.

बारामती शहरासह तालुक्यात १९४ प्राथमिक विविध कार्यकारी संस्था, १७८ पतसंस्था शहर व ग्रामीण, ३२ सेवक पतसंस्था, १८८ गृहनिर्माण, १३९ मजूर संस्था, ५९ पाणीपुरवठा, ९७ इतर प्रकारांतील (फळे भाजीपाला, प्रक्रिया, स्वयंरोजगार, वाहतूक, हस्तकला) अशा एकूण ८८७ संस्था आहेत.

### ■ अवसायनात सहकारी पतसंस्था अव्वल

पतसंस्थांचे मूळ उद्देश, संस्थेच्या सभासदांची उन्नती, संस्थेच्या कामकाजातील त्रुटी व गैरव्यवहार, यांच्यावर नियंत्रण ठेवण्याच्या उद्देशाने लेखापरीक्षण होणे अपेक्षित आहे. मात्र, याबबत संस्थाचालक उदासीन असल्यामुळे बारामती तालुक्यातील २५ पतसंस्था अवसायनात आल्या आहेत.

यामध्ये ६९ संस्थांची नोंदणी रद्द झाली आहे. तर, २२ संस्थांचे पुनरुज्जीवन करण्यात आले आहे, अशी माहिती सहायक निबंधक कुंभार यांनी दिली. सहकारी संस्थांच्या कामकाजात गुणात्मक वाढ होण्यासाठी करावयाच्या उपाययोजना व सहकार चळवळीच्या व्यापक हिताच्या दृष्टीने सरकारी स्तरावर करावयाचे धोरणात्मक निर्णय अपेक्षित आहेत.

# ओव्हाळांचा 'आरपीआय'शी संबध नाही

## स्टंटबाजी करण्यापेक्षा नगरसेवकपदाचा राजीनामा द्यावा : चंद्रकांता सोनकांबळे

**पिंपरी (प्रतिनिधी) :** पिंपरी-चिंचवड महापालिकेचे नगरसवेक बाळासाहेब ओव्हाळ यांनी भाजपपासून अलिप्त राहण्याची घोषणा केली असून त्यांचा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) गटाशी कोणताही संबंध नाही. ओव्हाळ यांनी नुसती स्टंटबाजी करण्यापेक्षा स्वाभिमान बाळगून भाजपच्या नगरसेवकपदाचा राजीनामा द्यावा. तसेच स्वत:च्या हिमतीवर प्रभागातून निवडून येऊन दाखवावे, असा सल्ला महाराष्ट्र प्रदेश महिला आघाडीच्या सरचिटणीस चंद्रकांता सोनकांबळे यांनी ओव्हाळांना दिला आहे.




पालिकेतील सभागृहनेत्याच्या कार्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. यावेळी बाळासाहेब भागवत, के. एम. बुक्तरस, अजीज शेख, लिंबराज कांबळे, विलास कांबळे, अल्ताफ शेख, राजेंद्र कांबळे, एम. पी. कांबळे, अशोक गायकवाड, सिंकदर सूर्यवंशी, केतन कांबळे, अतुल जाधव, रमेश चिमुरकर, लक्ष्मण गायकवाड उपस्थित होते.

नगरसेवक ओव्हाळ हे भाजपच्या तिकिटावर निवडून आले असले तरी ते रिपाइंचे समर्थक मानले जातात. त्यांनी भाजपपासून अलिप्त राहण्याची घोषणा केल्यानंतर रिपाइंच्या पदाधिका-यांनी ओव्हाळ यांच्याबद्दल भूमिका स्पष्ट केली आहे.

सोनकांबळे म्हणाल्या, ओव्हाळ यांना निवडणुकीत रिपाईऐवजी भाजपचे तिकिट हवे होते. त्यासाठीचे ते आरपीआयमध्ये आले होते. त्यांचा पक्षाशी कसलाही संबंध नाही. एका वर्षात त्यांना भाजप अत्याचारी, जातीयवादी पक्ष वाटू लागला आहे. पुणे शहरात रिपाइंचे पाच नगरसेवक व्यवस्थित काम करताना ओव्हाळ यांना भाजपबद्दल तिरस्कार वाटतो आहे. त्यांना राग असेल आणि खरा स्वाभिमान असल्यास नगरसेवकपदाचा राजीनामा द्यावा. भाजपपासून अलिप्त राहून नगरसेवकपद कायम ठेवण्याची त्यांची दुटप्पी भूमिका योग्य नाही. त्यांचा चळवळीशी काही संबध नसून रिपाइंची भूमिका कधी त्यांनी महापालिकेत मांडली नाही. त्यामुळे रिपाइंच्या नावाखाली स्टंटबाजी करून समाजासाठी काही वेगळे करत असल्याचे त्यांनी दाखवू नये, असेही त्यामी म्हटले आहे.

# टेक्सझोन तर्फे एचजीएच इंडियाचे बॉम्बे एक्झिबिशन सेंटर येथे ३ ते ५ जुलै २०१८ दरम्यान सातव्या आवृत्तीचे आयोजन

**पुणे (प्रतिनिधी) :** होम टेक्स्टाईल,होम डेकॉर,गिफ्टस व हाऊस वेअरचे भारतातील सर्वांत मोठे ट्रेड फेअर असलेल्या एचजीएच इंडिया २०१८ चे आयोजन ३ ते ५ जुलै २०१८ दरम्यान मुंबई येथील बॉम्बे एक्झिबिशन सेंटर येथे करण्यात आले आहे. या प्रदर्शनामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ब्रँडस, उत्पादक व वितरण भागीदार एकाच व्यासपीठावर एकत्र येतील.या ट्रेड शो द्वारे डिझायनर व ब्रँडेड उत्पादनांना एक समर्पित विपणन व्यासपीठ मिळते. ज्याद्वारे त्यांना वितरक,रिटेलर्स व इन्स्टिट्युशनल बायर्सपर्यंत पोहोचता येते.



उत्पादन श्रेणीमध्ये होम टेक्स्टाईल, फर्निशिंग फॅब्रिक्स आणि वॉलपेपर्स, ब्लाईंडस, रग्स, फ्लोअर कव्हरिंग्स, फ्रॅगरन्सेस, स्पा उत्पादने, हॅन्डीक्राफ्टस यांसारखी होम डेकॉर उत्पादने तसेच कुक वेअर, टेबल वेअर, किचन वेअर, किचन अप्लायंसेस, क्लिनिंग, हेल्थ अॅन्ड हायजीन, स्टोरेज व आऊटडोअर प्रॉडक्टस यांसारखे हाऊसवेअर प्रॉडक्टस आणि नाविन्यपूर्ण भेटवस्तूंचा समावेश आहे. लोकप्रिय, आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय ब्रँडससह आणि हँडमेड व मशिनमेड मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रातील अभिनवतेसह एचजीएच इंडिया सज्ज आहे. या प्रदर्शनात ३० हून अधिक देशातील ५५० हून अधिक कंपन्या सहभागी होत आहेत.

एचजीएच इंडिया २०१७ मध्ये भारतभरातून ४६२ शहरांमधून रिटेलर्स, डिस्ट्रीब्युटर्स व इन्स्टिट्युशनल बायर्ससह या क्षेत्रातील ३०,७०० हून अधिक व्यावसायिकांनी भेट दिली होती. व्यावसायिक खरेदीदार आपल्या वार्षिक गरजांसाठी तसेच नवीन व्यावसायिक संधींसाठी आणि २०-२५ टक्के प्रतिवर्ष वाढत असलेल्या होम कॅटेगरीमधील नवीन कल समजण्यासाठी येतात. एचजीएच इंडिया २०१८ मध्ये नेहमीच्या सहभागाव्यतिरिक्त चीन, टर्की व तैवान यांची दालने तसेच ऑस्ट्रेलिया, जपान, थायलंड, इटली, फ्रान्स, बेल्जियम, जर्मनी, युके, युएसए व कॅनडा येथील कंपन्या देखील सहभागी होत आहेत.

# यंदा पिंपरी-चिंचवडकरांना पाणीकपात नाही : आयुक्त हर्डीकर

**पिंपरी (प्रतिनिधी) :** पिंपरी-चिंचवड शहरातील पाणीपुरवठा सुरळीत सुरु आहे. काही भागात थोड्या तक्रारी येतात. परंतु, त्या गतवर्षी इतक्या नाहीत. पवना धरणात मुलबक पाणीसाठा आहे. त्यामुळे यंदा पाणीकपात करण्यात येणार नाही, असे आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी स्पष्ट केले.

पिंपरी पालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत शहरात दैनंदिन पाणीपुरवठा केला जातो. पवना धरणातून दिवसाला नदीपात्रत ३० ते ३५ दक्षलक्ष घनफूट पाणी सोडले जाते. आजमितीला पवना धरणात ३५.२९ टक्के पाणीसाठा असून गेल्या वर्षी याच दिवशी ३४ टक्के पाणीसाठा होता. हा पाणीसाठा १५ जुलैपर्यंत पुरेल एवढा आहे. उन्हाळा २० दिवस राहिला आहे. त्यामुळे यंदा पाणीकपातीची आवश्यकता भासणार नाही. गतवर्षी पवना धरणात मुलबक पाणीसाठा असतानाही सत्ताधारी आणि प्रशासनाने शहरवासियांवर पाणीकपात लादली होती. त्यावरुन सत्ताधाश्यांवर जोरदार टीका झाली होती. त्यामुळे सत्ताधाऱ्यांनी यंदा पाणीकपात करण्याबाबत दक्षता घेतली. पाणीकपात करायची नाही, अशा सक्त सूचना सत्ताधाऱ्यांनी प्रशासनाला दिल्या होत्या.

आयुक्त हर्डीकर म्हणाले, शहरातील पाणीपुरवठा सुरळीत आहे. काही भागात थोड्या तक्रारी येतात. परंतु, त्या गतवर्षी इतक्या नाहीत. ज्या भागात कमी पाणीपुरवठा येत आहे. तेथील दुरस्ती करावी, अशा सूचना देखील दिल्या आहेत तसेच यंदा पाणीकपात केली जाणार नसल्याचेही, त्यांनी सांगितले.

# दोन लाखांच्या खंडणीसाठी ११ वर्षांच्या मुलाची हत्या करणाऱ्या आरोपीला फाशी

**नागपूर :** दोन लाखांच्या खंडणीसाठी साहिल उर्फ यश नितीन बोरकर या ११ वर्षाच्या मुलाची हत्या करणाऱ्या आरोपी संतोष कळवेला अटक फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. नागपुरात २०१३ मध्ये ही घटना घडली होती. अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. सी. मुनघाटे यांनी हा निर्णय दिला. संतोष कळवेला अपहरण आणि खून अशा दोन्ही गुन्ह्यांमध्ये फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. ११ जून २०१३ रोजी ही घटना घडली होती. २०१३ मध्ये यश नितीन बोरकर पाचवीत शिकत होता. आरोपीने त्याचे अपहरण केले. यशला आरोपीच्या मोटरसायकलवर बसून जाताना दोन लहान मुलांनी पाहिले होते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मिहान परिसरात यशचा मृतदेह आढळून आला होता. न्यायालयात आरोपीतर्फे अॅड. संतोष चांडे तर, सरकारतर्फे अॅड. विजय कोल्हे यांनी बाजू मांडली.



### ■ काय आहे प्रकरण?

नितीन बोरकर यांचे केस कर्तनालयाचे दुकान आहे. ते आई, वडील, पत्नी, मुलगी व मुलासह राहात होते. १० जून २०१३ ला नितीन हे दुकानात असताना आरोपीने त्यांच्या मुलाचे अपहरण केले. त्यानंतर त्यांच्या भ्रमणध्वनीवर संपर्क करून दोन लाख रुपयांची खंडणी मागितली. त्यानंतर बोरकर यांनी सोनेगाव पोलिसांशी संपर्क केला. त्यानंतर आरोपीने सिमेंटच्या दगडाने ठेचून त्याचा खून केला. यशच्या शरीरावर एकूण २२ जखमा होत्या. पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली.

# कौटुंबिक उद्योगाच्या व्यवस्थापनासाठी टीएसडब्लू, आयआयएम कोलकत्ता यांच्यातर्फे अभ्यासक्रमाचे अनावरण

**पुणे (प्रतिनिधी) :** इंडियन इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट कलकत्ता आणि टीएसडब्ल्यू यांनी संयुक्त विद्यमाने कौटुंबिक स्तरावर चालवल्या जाणाऱ्या उद्योगांच्या व्यवस्थापनाबाबत पोस्ट ग्रॅज्युएट प्रमाणपत्र अभ्यासक्रम आणला आहे जो कौटुंबिक स्तरावर चालवल्या जाणाऱ्या उद्योगांच्या नव्या पिढीला प्रशिक्षित आणि सक्षम करेल. या अभ्यासक्रमाचे मुख्य ध्येय हे वारसदारांना नवीन आव्हानांना कसे सामोरे जावे आणि नवीनोत्त्म उद्योग व्यवस्थापन पद्धती आणि प्रक्रिया व्यवस्थापनात स्वीकारून व्यावसायिकता स्वीकारणे याबाबत मदत करून त्यांना सक्षम करण्याचे आहे.



देशातील सध्याचे उद्योगाचे वातावरण हे अत्यंत गतिशील असल्याने स्पर्धेत अग्रणी राहण्यासाठी कौटुंबिक मालकी असलेले उद्योग आणि तरुण उद्योजकांनी हाती घेतलेले उपक्रम यासाठी आपले उद्योग चालवताना व्यावसायिक पद्धती स्वीकारणे आवश्यक आहे. हा अभ्यासक्रम कौटुंबिक स्तरावर चालवण्यात येणाऱ्या उद्योगधंद्यांच्या गरजांना अनुसरून आखण्यात आलेल्या संकल्पना आणि व्यवस्थापन पद्धती याबाबत माहिती मिळविणे शक्य करतो. यातून नवीन डावपेच बनविणे व त्याच बरोबर टिकून राहण्यासाठी आणि उद्योगाच्या वृद्धीसाठी व्यावसायिक व्यवस्थापनाशी संबंधित सिद्धांतांच्या बाबत खोलवर ज्ञान त्यांना यातून मिळू शकेल.

१२ महिन्यांच्या या अभ्यासक्रमात दर आठवड्याला २ दिवस वर्ग असतील ज्यात १० दिवसाच्या आयआयएम कलकत्ता येथे ऑन कॅम्पस सत्रांचा समावेश आहे. यात संवादात्मक चर्चा, प्रत्यक्ष प्रकल्प आणि असाईनमेंट्स व त्याच बरोबर वैयक्तिक मार्गदर्शन यांचा समावेश आहे. अभ्यासक्रमाच्या स्वरूपाचे ध्येय हे सहभागींना ज्ञान लगेचच कृतीत वापरता यावे हे आहे.

भारतात व्यावसायिक मोठ्या प्रमाणवर उद्योग चालू करत आहेत, त्यांना येणाऱ्या संधींचा फायदा मिळावा यासाठी उत्कृष्ट व्यवस्थापन कौशल्य त्यांच्यावर बिंबवणे खूप आवश्यक आहे. आयआयएम कोलकात्ताचा टीएसडब्ल्यू च्या बरोबर भागीदारीतील फॅमिली बिझनेस अॅड एंटरप्रेनर्शीप प्रोग्राम त्यांना आधुनिक उद्योग पद्धतींच्या बाबत संपूर्ण माहिती देऊन उद्याचे उद्योगातील नेते बनायला मदत करेल. असे टाइम्स प्रोफेशनल लर्निंगचे प्रेसिडेंट अनिश श्रीकृष्ण म्हणाले. कौटुंबिक उद्योगांच्या मालकांसाठी या अभ्यासक्रमाच्या असलेल्या असंख्य फायद्यांबाबत बोलताना प्रोग्राम डायरेक्टर प्रोफेसर प्रफुल्ल अग्निहोत्री म्हणाले की आयआयएम कलकत्ताकडे असाधारण उद्योग विषयक नेतृत्त्व तयार करण्याचा वारसा आहे आणि टीएसडब्लूचे संपूर्ण भारतात असलेले जाळे आमच्याकडे असलेल्या कौशल्याचा फायदा घेण्यास उद्योजकांना मदत करेल.

# पर्ल अकॅडेमीच्या मुंबई कॅम्पसमध्ये मनीष अरोरा यांनी विद्यार्थी व शिक्षकांसोबत साधला विशेष संवाद

**पुणे (प्रतिनिधी) :** डिझाईन, फॅशन, व्यवसाय व प्रसिद्धीमाध्यमे या क्षेत्रातील भारतातील आघाडीची शिक्षणसंस्था पर्ल अकॅडेमीने आंतरराष्ट्रीय पातळीवरील नामांकित डिझायनर मनीष अरोरा यांची आयडिएशन पार्टनर म्हणून निवड केली आहे. पर्ल अकॅडेमी व मनीष अरोरा यांच्या दरम्यान झालेल्या या नवीन भागीदारीच्या निमित्ताने मनीष अरोरा यांनी पर्ल अकॅडमीच्या मुंबई कॅम्पसला भेट देऊन तेथील विद्यार्थी व शिक्षकांसोबत संवाद साधला. अत्युत्तम कारिगरी व अनोखी रंगसंगती यामुळे आधुनिक डिझायनर्सच्या पंक्तीत नावाजले जाणारे मनीष अरोरा यांनी पर्ल अकॅडमीच्या विद्यार्थ्यांना आपले काही खास अनुभव सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचा सल्ला दिला की, खूप मेहनत करा व विचार संकुचित ठेऊ नका, नेहमी जागतिक पातळीवरचा विचार करा. मनीष अरोरा यांना प्रत्यक्ष भेटून व त्यांच्याकडून त्यांचे



अनुभव ऐकताना विद्यार्थी भारावून गेले होते. पर्ल अकॅडमीच्या मुंबई कॅम्पसला मनीष अरोरा यांनी दिलेली ही पहिली भेट संस्मरणीय ठरली.

मनीष अरोरा यांनी केवळ भारतातीलच नव्हे तर संपूर्ण जगभरातील फॅशन ट्रेण्ड्सना नवी व्याख्या मिळवून दिली आहे. मार्च महिन्यात पर्ल अकॅडमीच्या नऊ विद्यार्थ्यांनी, ज्यामध्ये मुंबई कॅम्पसमधील दोन विद्यार्थ्यांचाही समावेश होता, मनीष अरोरा यांना पॅरिस फॅशन वीक २०१८ साठी कामात सहायक म्हणून मदत केली होती. या फॅशन वीकमध्ये मनीष अरोरा हे गेली दहा वर्षे सलग सहभागी होत आहेत.

या भागीदारीबद्दल बोलताना मनीष अरोरा यांनी सांगितले की, पर्ल अकॅडेमीसोबत त्यांचा आयडिएशन पार्टनर म्हणून सहयोग करताना मला अतिशय आनंद होत आहे. पॅरिस फॅशन वीकमध्ये त्यांच्या विद्यार्थ्यांना मला अनेक नवीन गोष्टी शिकवता येणार आहेत. हा अनुभव त्यांच्यासाठी ज्ञानाच्या कक्षा रुंदावणारा ठरेल. फॅशन जगतातील डिझाईन व व्यवसाय यातील अनेक नवीन गोष्टी त्यांना शिकता येतील. या हुशार व सर्जनशील विद्यार्थ्यांना अधिकाधिक माहिती, अनुभव व कौशल्ये शिकून घेण्यात मदत करताना मला खूप आनंद मिळणार आहे.

'लोकभवन' हे दैनिक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक आनंदा प्रभाकर कांबळ यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१ डी/१ ए, सोमवार पेठ, पुणे ४११ ०११ येथे छापून प्रतिभा क्लासिक, सोमवार पेठ पुणे ४११ ०११ येथे प्रकाशित केले. ● या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संस्थापक, संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. ● (वाद विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत.) ऑफिस संपर्क : 020 26111226 भ्रमण ध्वनी : 8788187697, E-mail : lokbhavan@rediffmail.com / lokbhavanpune@gmail.com